आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर
www.dainiklaturprabhat.in




दैनिक
# लातूर प्रभात

E-mail :- laturprabhat@gmail.com

मुख्य संपादक : रघुनाथ बनसोडे मो.नं.८८३०२ ५०६४५,

RNI No.: - MAHMAR/2017/72894 ● वर्ष ८ वे ● अंक ८७ वा ● रविवार दि. २५ ऑगस्ट २०२४ ● किंमत २ रूपया ● पाने ४ ●

## राज्यस्तरीय कृषी महोत्सवास एक दिवस मुदतवाढ - कृषिमंत्री धनंजय मुंडे

मुंबई, : परळी वैजनाथ, जिल्हा- बीड येथे राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचे दि. २१ ते २५ ऑगस्ट २०२४ दरम्यान आयोजन करण्यात आलेले आहे. कृषी महोत्सवास राज्यातील शेतकरी बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता या प्रदर्शनाचा कालावधी एक दिवस वाढवण्यात येत आहे. त्यामुळे या कृषी महोत्सवाचा समारोप दि. २५ ऑगस्ट ऐवजी २६ ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात येईल. सर्व शेतकरी बांधवांनी याची नोंद घ्यावी व या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. या महोत्सवामध्ये कृषी निविष्ठा, कृषी अवजारे, सिंचन साधने, संरक्षित शेती साधने, महिला गट, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपन्या इत्यादींच्या उत्पादित वस्तू, खाद्यपदार्थ यांचे प्रदर्शन व विक्री साठी ४०० हून अधिक स्टॉल प्रदर्शित करण्यात आलेले आहेत.

## गणेश मंडळांनी सीसीटीव्ही, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पारंपरिक वाद्यांवर भर द्यावा - मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील



पुणे, : आगामी गणेशोत्सव गणेश मंडळांनी सामाजिक भावनेतून शांततेत आणि उत्साहात साजरा करावा, असे आवाहन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी केले. गणेशोत्सव काळात मंडळांनी मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करावे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन आणि विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांनाच प्राधान्य द्यावे असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

मंडळांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मंत्री पाटील म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी समाजाच्या एकजुटीसह गरजू लोकांना मदत होईल, या भावनेतून सार्वजनिक गणेशोत्सव ही संकल्पना मांडली. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनीही उत्सव काळात जनजागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, त्यासाठी आपल्या देखाव्यांमधून महिला सुरक्षा, राष्ट्रीय सुरक्षा असे विषय साकारावेत.

गणेशोत्सव काळात कोणतेही अनुचित प्रकार घडू नयेत, यासाठी मंडळांनी आपल्या मंडपात सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित करणे आवश्यक आहे. तसेच, जनजागृतीसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेदेखील आयोजन करावे. त्यासोबतच ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिला पाहिजे. या तिन्ही गोष्टींसाठी मंडळांना सर्वतोपरी मदत करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी मंडळाच्या कार्यकर्त्यांना गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा करण्याचे आवाहन केले. कायद्याचे पालन करणाऱ्या गणेश मंडळांना सलग पाच वर्षे परवानगी देण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत. त्यामुळे गतवर्षी परवानगी घेतलेल्या मंडळांना पुन्हा परवानगीची गरज नाही. मात्र, परवानगी घेताना मंडळांनी नियम व अटींचे पालन करणे आवश्यक आहे. मंडळांनी महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना कराव्यात. तसेच अनुचित प्रकार टाळण्यासाठी उत्सव काळात मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सजग रहावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

पोलीस उपायुक्त जाधव यांनी बैठकीच्या सुरुवातीला प्रास्ताविक करताना चतु:शृंगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २५० गणेश मंडळे असून गणेशोत्सवाच्या अनुषंगाने मंडळांच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधल्याची माहिती दिली. गणेशोत्सवासाठी पोलीस दलाचे योग्य नियोजन केले असल्याचे त्यांनी सांगितले.

## महानिर्मितीचा २५ मेगावॅट स्थापित क्षमतेचा साक्री-१ सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित

मुंबई, : महानिर्मितीने धुळे जिल्ह्यात साक्री तालुक्यातील शिवाजीनगर येथे एकूण ७० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे काम हाती घेतले आहे. त्यामध्ये साक्री-१ (२५ मेगावॅट), साक्री-२ (२५ मेगावॅट) आणि साक्री-३ (२० मेगावॅट) चा समावेश आहे. यापैकी साक्री-१ येथे २५ मेगावॅटचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारणीचे काम मेसर्स गोदरेज आणि बॉयस या विकासकाने इ.पी.सी. (अभियांत्रिकी खरेदी आणि उभारणी तत्वावर) हा प्रकल्प विकसित केला असून क्रिस्टलाईन पद्धतीचे सौर पॅनेल आहेत. या प्रकल्पाची कॅपॅसिटी युटीलायझेशन फॅक्टर (सी.यू.एफ.) २०.५९ टक्के असून वार्षिक वीज निर्मिती ४५.०९ दशलक्ष युनिट अपेक्षित आहे.

२१ ऑगस्ट रोजी हा सौर प्रकल्प कार्यान्वित करून २२०/३३ के.व्ही. शिवाजीनगर, साक्री उपकेंद्राशी यशस्वीरित्या जोडण्यात आला. साक्री-१ प्रकल्पामुळे ५० लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. आता महानिर्मितीची एकूण सौर ऊर्जा स्थापित क्षमता ४२८ मेगावॅट इतकी झाली आहे.




## द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडिया, पुणे यांच्याकडून बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड पारितोषीक

**लातूर प्रतिनिधी : द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाने २०२४ वर्षातील प्रतिष्ठित बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड हा पुरस्कार विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना परिवारातील विलास सहकारी साखर कारखाना युनिट - २, तोंडार, उदगीर येथील कारखान्यास प्रदान केला, हा सहकार आणि साखर उदयोगातील मानाचा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी कारखान्याचे संचालक मंडळ, कार्यकारी संचालक यांनी डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या कार्यक्रमात पुणे येथे स्विकारला.**

द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए) इंडियाचे गळीत हंगाम २०२३-२४ साठीच मानाच राज्यस्तरीय बेस्ट शुगर फॅक्टरी अवॉर्ड पारीतोषिकासाठी विलास सहकारी साखर कारखान्यानी केलेल्या कामगिरीचे मुल्यमापन करूनच या पारीतोषिकासाठी निवड करण्यात आली होती. सदरील पारीतोषीक शनिवार दि. २४ ऑगष्ट २४ रोजी पुणे येथील सभागृह, जे. डब्ल्यू. मॅरियट सेनापती बापट रोड येथे डीएसटीएच्या वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन सत्रादरम्यान माजी मंत्री हर्षवर्धन पाटील आणि राज्यातील मान्यवरांच्या हस्ते स्विकारण्यात आले.

कारखान्याच्या वतीने हा पुरस्कार माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत कारखान्याचे व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, कार्यकारी संचालक आत्माराम पवार, संचालक सर्वश्री गोविंद बोराडे, अनंत बारबोले, नारायण पाटील, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रंजित पाटील, भैरवनाथ सवासे, गुरूनाथ गवळी, गोविंद डुरे, अमृत जाधव, भारत आदमाने, रामदास राऊत, सुभाष माने, संजय पाटील खंडापूरकर, कल्याण पाटील, ग्यानोबा गोडभरले, पंडीत ढगे, विनोबा पाटील, संदिप पाटील, मन्मथअप्पा किडे, संतोष तिडके, मारोती पांडे, कारखान्याचे अधिकारी अजय कोळगे, देविदास मोकाशे, सुनिलकुमार चापूले, राजेसाहेब खोसे, तानाजी गुमनार, किशन चौधरी, संदिप शिंदे आदीनी स्विकारला.

आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचे मार्गदर्शन, माजी मंत्री, आमदार, संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख साहेब, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशाली विलासराव देशमुख यांचे नेतृत्वाखाली विलास सहकारी साखर कारखाना यशस्वीपणे वाटचाल करीत आहे.

विलास सहकारी साखर कारखान्याने झालेल्या गळीत हंगामात कार्यक्षमतेचा केलेला वापर, पाण्याची बचत व पूर्नवापर, इंधन व ऊर्जेत बचत, साखर उताऱ्यात वाढ, ऊसतोडणी, वाहतुक यंत्रणेचा कार्यक्षम वापर, तांत्रीक कार्यक्षमता, ऊसविकास योजना, मनुष्बळ विकास उपक्रम, ऊस गाळप, साखरेचे दर्जासह यावेळी या सर्व कामाचे द डेक्कन शुगर टेक्नोलॉजिस्ट्स असोसिएशन (डीएसटीए), पुणे व उपस्थित सर्व मान्यवरांनी कारखाना वाटचाली बद्दल व्यवस्थापन आणि प्रशासनाचे कौतुक केले.

या पारितोषिकाने विलास कारखान्यास गौरविण्यात आले, याबद्दल माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री, आमदार संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख, लातूर ग्रामिणचे आमदार धिरज विलासराव देशमुख, चेअरमन वैशालीताई विलासराव देशमुख यांनी कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, आधिकारी, कर्मचारी वर्ग, वाहतूक ठेकेदार, तोडणी मंजूर व कंत्राटदार या सर्वाचे व्यवस्थापनाचे वतीने अभिनंदन केले.



### माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख आणि मांजरा परीवारातील व्यवस्थानपनाचे कौतुक

राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली विलास साखर कारखान्याची उभारणी आणि यशस्वी वाटचाल सुरू आहे. लातूर जिल्हयातील उदगीर येथील बंद असलेला हा कारखाना अवसायानात निघालेला होता. तेथील शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा प्रश्र्न निर्माण झाला होता. तेथील सभासद, शेतकरी यांच्या मागणीची दखल घेऊन तो कारखाना घेऊन विलास कारखाना मार्फम सहकारी तत्वावर चालविण्याचा निर्णय घेतला. कारखाना चांगला चालण्यासाठी त्यात तांत्रीक बदल करण्यात आले, अंतर्गत आधुनीकीकरण, विस्तीरीकरण करुन पुर्नजीवीत करण्यात आला. तेथे सर्वच गळीत हंगामात ऊसाचे विक्रमी गाळप केले, चांगल्या दर्जाच्या साखरेचे उत्पादन केले, चांगला साखर उतारा मिळवीण्याचे काम केले. येथील ऊसाला मराठवाडा विदर्भ विभागात सर्वांधीत ऊसदर देण्याचे काम केले. या यशस्वी कामगीरी बददल राज्याचे माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचे या प्रसंगी सर्वांनी कौतुक केले.

## विधानसभा निवडणुकीपूर्वी महायुतीत वादाचे फटाके! रामदास आठवलेंनी दिला मित्रपक्षांना इशारा

रत्नागिरी, : रत्नागिरी जिल्ह्यातल्या खेडमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचा कोकण प्रदेशचा मेळावा पार पडला. आरपी आयचे अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या उपस्थितीत भव्य सत्कार संपन्न झाला. यावेळी रामदास आठवले यांनी आपल्या खास शैलीमध्ये कार्यकर्त्यांना मार्ददर्शन केले. आम्ही देखील महायुतीमध्ये आहोत. मात्र, आमचे नाव कुठेही घेतले जात नाही. तीन पक्ष आल्यानंतर आम्हाला विसरले, पण पक्षात लहान जरी असला तरी वर्गणी पॉवर आमच्या पक्षाची चालते. आम्ही ज्या पक्षासोबत असतो त्यांची सत्ता येते आणि आम्ही ज्यांच्या सोबतनसतो त्यांची सत्ता येत नाही, असे म्हणत महायुतीतील घटक पक्षांना इशारा दिला आहे.

पूर्वी भाजप आणि शिवसेनेला युती म्हणायचे. आता तीन पक्ष एकत्र आल्यामुळे आमचं कुठेही नाव येत नाही. शासन आपल्या दारी आणि आम्ही आमच्या घरी अशी मिश्कील टिपण्णी आठवले यांनी केली. रिपब्लिकन पार्टी आल्यानंतर महायुती झाली आहे. ते शिवसेना, राष्ट्रवादी आणि भाजपने लक्षात घ्यायला हवी. आमचा पक्ष छोटा असला तरी कोणाला निवडून द्यायचे आणि कोणाला पाडायचे हे आम्ही ठरवतो. ज्यांच्या सोबत मी जातो त्यांना सत्ता मिळते. गेल्या तीन दशकाचा महाराष्ट्राच्या राजकारणात हा अनुभव आहे. गट किती असू द्या. पण रामदास आठवले हा पठ्ठ्या दिल्लीत असणारा एकमेव आहे.

बाबासाहेबांनी सांगितले आहे. सत्तेपर्यत पोहोचणे आवश्यक आहे. आणि मी ज्यांच्या सोबत जातो त्यांना सत्ता मिळते. त्यांना सत्ता मिळाली, मला मिळते, मला नाही मिळाली तर त्यांनाही मिळत नाही. त्यामुळे सत्तेसाठी असणारी बार्गेनिंग पॉवर आमच्या पक्षात आहे, असा इशारा रामदास आठवले यांनी दिला.

## काश्मीरसाठी स्वतंत्र झेंडा, ३७० वे कलम पुन्हा लागू करु नॅशनल कॉन्फरन्सच्या जाहीरनाम्याशी काँग्रेस, उबाठा सहमत आहेत का मुंबई भाजपा अध्यक्ष आ. आशीष शेलार यांचा सवाल



मुंबई : जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीसाठीच्या जाहीरनाम्यात नॅशनल कॉन्फरन्सने काश्मीरसाठी वेगळा झेंडा निर्माण करू, ३७०, ३५ (अ) कलम पुन्हा लागू करू आदी आश्र्वासने दिली आहेत. या आश्र्वासनांशी काँग्रेस, उबाठा सहमत आहेत का असा सवाल मुंबई भाजपा अध्यक्ष आ. आशीष शेलार यांनी शनिवारी केला.भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान हे यावेळी उपस्थित होते. संपूर्ण देश तिरंगा झेंड्याखाली एकत्र असताना काश्मीरसाठी स्वतंत्र झेंडा तयार करण्याचे आश्वासन देणे म्हणजे तुकडे-तुकडे गँग पुन्हा कामाला लागली असल्याचे दिसून येत आहे, असा घणाघाती हल्ला आ. शेलार यांनी चढविला.

आ. शेलार यांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या जाहीरनाम्यातील आश्वासनांचा उल्लेख करत काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली. आ. शेलार म्हणाले की, नॅशनल कॉन्फरन्सने काश्मीरसाठी पूर्वीप्रमाणे स्वतंत्र झेंडा तयार करू, असे आश्वासन दिले आहे. 'एक देश में दो विधान, दो निशान, दो प्रधान नही चलेंगे', ही भाजपाची, जनसंघापासूनची भूमिका आहे. काँग्रेस नेतृत्वाने, उद्धव ठाकरे यांनी नॅशनल कॉन्फरन्सच्या या आश्वासनाशी आपण सहमत आहोत का, हे स्पष्ट करावे. नॅशनल कॉन्फरन्सने विधानसभा निवडणुकीत मते मिळवण्यासाठी ही देशविघातक भूमिका घेतली आहे. त्याचबरोबर ३७० आणि ३५(अ) ही घटनेतील कलमे पूर्ववत करू, असे आश्वासनही नॅशनल कॉन्फरन्सने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. याचा अर्थ ३७० आणि ३५ (अ) रद्द करण्यापूर्वी राज्यात जी स्थिती होती ती पुन्हा आणणे असा होतो. या आश्वासनाला काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांचे समर्थन आहे का, असा प्रश्नही आ. शेलार यांनी यावेळी उपस्थित केला.

आ. शेलार पुढे म्हणाले की, नॅशनल कॉन्फरन्सने जाहीरनाम्यात शंकराचार्य पर्वताचे ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक महत्व विसरून त्याचे तख्त-ए-सुलेमान असे नामांतर करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचबरोबर हरी पर्वताचे कोह-ए-मारन असे नामांतर करण्याचे आश्वासनही या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांनी अलिकडेच एका शंकराचार्यांना आपल्या निवासस्थानी आमंत्रित केले होते. त्यांचे या नामांतराला समर्थन आहे का, काँग्रेसची या नामांतराबाबत भूमिका काय, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. नॅशनल कॉन्फरन्सने आपल्या जाहीरनाम्यात आरक्षणाच्या धोरणाचा पुनर्विचार करू, असे आश्वासन दिले आहे. ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील दलित समाजाला, गुज्जर, बाकरवाल या समाजाला भारतीय संविधानानुसार आरक्षण मिळू लागले आहे. नॅशनल कॉन्फरन्सने याच आरक्षणाचा पुनर्विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. याविषयी काँग्रेसची भूमिका काय, उद्धव ठाकरेंची भूमिका काय हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. तुकडे-तुकडे गँगच्या या कार्यक्रमाला काँग्रेस आणि उद्धव ठाकरे यांचे समर्थन आहे का,हे महाराष्ट्राच्या जनतेला जाणून घ्यायचे आहे, असेही आ. शेलार म्हणाले.

# मातुळ ग्रामपंचायतिने दारुबंदीसाठी घेतला एक मुखी ठराव

## तंटामुक्त समितीच्या वतीनेही भोकर पोलिसांना निवेदन

**भोकर / सिद्धार्थ जाधव / तालुक्यातील मौजे मातुळ गावातील अवैध दारूविक्री बंद व्हावी म्हणून सातत्याने भोकर पोलिसांना सांगूनही गावातील अवैद्य दारू विक्री बंद होत नसल्याने अखेर गावातील दारू बंदीच्या मागणीसाठी येथील युवकांच्या पुढाराने मातुळ ग्रामपंचायतिने एकमुखी ठराव घेण्यात आला.ग्रामपंचायतिच्या या निर्णयाचे स्वागत करित तंटामुक्ती गाव समितीनेही भोकर पोलिसांना निवेदन दिले आहे.**

पाच हजार लोकसंख्या असलेले मातुळ हे गाव महाराष्ट्र व तेलंगणा राज्यसीमेवर वसलेले आहे.या ठिकाणी अवैध व्यवसायिकांनी आपले बस्तान बसविले असून प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात देशी व गावठी दारूची विक्री होत आहे. त्यामुळे गावात तंट्यांचे प्रमाणही वाढले आहे. शिवाय, तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. त्यामुळे घरोघरी भांडणे वाढत असून, काही जणांचे संसारही उद्धस्त झाले आहेत. गावात जिल्हा परिषद शाळा, एसबिआय बँक, आश्रम शाळा असून आजूबाजूच्या गावातील नागरिकांची वर्दळ असते अशात दारुड्या लोकांकडून बाहेरगावातील नागरिकांना त्रास देण्याचे प्रमाणही वाढले आहे.

गावातील अवैध दारुविक्री बंद करण्यात यावी म्हणून गावातील काही मंडळी सातत्याने भोकर पोलिस प्रशासनाकडे पाठपुरावा केला मात्र, दारुबंदी तात्पुरती बंद होत असे व काही दिवस उलटले की पुन्हा अवैध दारुविक्री सुरु होत असते. त्यामुळे गावात होत असलेली अवैध दारुविक्री बंद करावी व दारुविक्री करणाऱ्यांवर तसेच त्यांना मदत करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी आदी मागणी करिता १५ ऑगस्ट रोजीच्या ग्रामसभेत शहीद भागत सिंग युथ मंडळाने हा सामाजिक हिताचा विषय उपस्थित केला.या विषयाला गांभीर्याने घेऊन दारू बंदीसाठी ग्रामपंचायतिने एक मुखाने ठराव घेतला आहे. ग्रामपंचायतिने घेतलेल्या ठरावाची प्रत व निवेदन दिनांक २४ ऑगस्ट रोजी भोकर पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.



१५ ऑगस्ट रोजी ग्रामपंचायतिने घेतलेल्या निर्णयचे स्वागत करित मातुळ येथील महात्मा गांधी तंटामुक्त गाव समितीच्या वतीनेही पोलिसांना निवेदन देण्यात आले.

निवेदनावर सरपंच सविताबाई कदम, उपसरपंच माधव बोईनवाड, तंटामुक्तीचे अध्यक्ष नामदेव कदम, ग्रामपंचायत सदस्य यांच्यासह पोलीस पाटील लक्ष्मण बोईनवाड,बालाजी सूर्यतळे, महादेव बच्चलवाड, आनंद रिठेवाड, श्याम बोईनवाड,तुळशीराम कदम,दत्ता कदम, आमृता जाधव आदींसह गावातील सुमारे चाळीस प्रमुख व्यक्तीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

> गावात गेल्या काही वर्षांपासून अवैध दारूविक्री होत आहे. ती बंद व्हावी म्हणून सातत्याने प्रयत्न करण्यात आले. परंतु, अवैध दारूविक्रेत्यास गावातीलच काहीजण मदत करीत असल्याने अडचण होत होती. अखेर ग्रामपंचायतीने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. त्यामुळे निश्र्चितच गावातील अवैध दारुविक्री बंद होईल. तसेच गावातील तंट्यांचे प्रमाण कमी होईल.
>
> **नामदेव कदम,तंटामुक्ती अध्यक्ष,मौंजे मातुळ**

आता दै. लातूर प्रभात इंटरनेटवर वाचा एका क्लिकवर www.dainiklaturprabhat.in

# राहुलजी गांधी सावधान !

## संपादकीय...

इंदिरापर्वामुळेच गांधी घराणे सत्ताकारणात आहे. म. गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांचा कार्यकाल वेगळा होता. इंदिरा गांधी यांनी सत्ताकारण-प्रशासन व्यवस्थेतील बदलाचे-बँकिंग क्षेत्रातील, गायरानजमिनी वगैरे बाबतीत जे काही केले ते राजीव गांधी यांना जमले नाही परंतु वैज्ञानिक-तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांनी कामगिरी बाबत कोणीही तडजोड करू शकत नाही हेच राजीव गांधी यांचे श्रेय आहे-असावे, केंद्रीय सत्ताकारण कोणीही करतो. पाठबळ असेल किंवा पर्याय म्हणून कोणीही भारताचा पंतप्रधान होऊ शकतो यात संदेह नाहीत पण आजच्या राजकीय-सत्ताकारणातील परिस्थिती आमच्यामुळेच बदलत आहे असा कोणीही दावा करू शकत नाही ते जनमतावर अवलंबून असते. राहुल गांधी हे एक नाममात्र गांधी घराण्यातले नाव आहे, सामाजिक-राजकीय-प्रशासकीय अभ्यास हा कौटुंबिक आहे. प्रत्यक्षातला अनुभव नाही पण काँग्रेस पक्षाच्या जडणघडणीत ज्यांनी आयुष्य वेचले ते साधे ग्रामपंचायत सदस्य ही होऊ शकले नाही पण तेच काँग्रेसची प्रामाणिक आहेत. मग सत्ताकारणातील आमदार, खासदार, मंत्री, मुख्यमंत्री, आणि होऊ गेलेले प्रधानमंत्री ही चुकले-हुकले असतील पण राहुल गांधी म्हणून तुम्ही काँग्रेसची कार्यकर्त्यांना दोष देऊन त्यांच्यामुळेच पक्ष कमकुवत होतो आहे ही भावना व्यक्त करताना काँग्रेसी इतिहास तपासून पाहायला हवा होता पण तसेच झाले नसल्याने राहुलजी गांधी सावधान! असा बोलबाला होताना दिसतो आहे. हे वास्तव नाकारता येत नाही.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमधील अनेक जाणकार-अभ्यासू मंडळी आज घडीला बाहेर आहेत. अनेक मतदार पक्षाबाहेर आहेत. आज फक्त आहे त्या गांधी घराण्याची हांजी-हांजी करणारे आहेत. काँग्रेसपक्षाची हांजी -हांजी करणारे नाहीत याचे कारण केवळ राहुल गांधी असावेत. अशी जी काँग्रेसी वर्तुळात चर्चा होते आहे ती निरर्थक नसावी असे वाटते.

भारतातील काँग्रेची कमकुवत होत आहे असा जो आरोप आहे तोच मुळात चुकीचा ठरतो कारण काँग्रेसच्या श्रेष्ठ मुळे जी काही राज्य सत्ता दिन झाली आणि त्यांनी कोणी स्वबळावर सत्ता काबीज ठेवून काँग्रेसला जिवंत ठेवले त्यातच बदनाम करण्याचे विधान संसदेतील काँग्रेसचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी करीत असतील तर काँग्रेसचे जुने निष्ठावंत गुलाब नबी आझाद, कपिल सिब्बल कोठे आहेत. गांधी घराण्याचे पाय धुऊन पाणी पिणारे सुशील कुमार शिंदे, शिवराज पाटील चाकूरकर कोठे आहेत. इंदिरा गांधी यांचा विश्र्वासू नेता कार्यकर्ता मुकुल वासनिक हे मल्लिकार्जुन खरगे यांचे बाहुले बनवून कार्यरत आहेत त्यात गांधी घराण्याचा आधार घेऊन काँग्रेसशासित राज्याचे मुख्यमंत्री, माजी मुख्यमंत्रीच काँग्रेसला कमकुवत करीत आहेत असा जो संस्थात्मक आरोप करीत आहेत हीच बाब राहुल गांधी यांना धोकादायक ठरू शकते अशीच राजकीय वर्तुळात संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त होताना दिसते आहे.

वास्तविक पाहता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हस्तक भाजपचे बाहुले असलेले भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी काँग्रेसमुक्त भारत-भ्रष्टाचार मुक्त भारत म्हणून ओरडत असल्याने इंडिया-महाविकास आघाडीला जनतेने मतदारांनी जीवदान दिले ते दान सांभाळून भारत काँग्रेसमय करण्याऐवजी काँग्रेसी कार्यकर्ते-नेत्यालाच दोष देऊन सत्ताकारण करणारे राहुल गांधी कोण असाच सवाल सर्वसामान्य जनतेतून प्रकट होत असल्याने राहुलजी गांधी जरा सावधान अशीच म्हणण्याची वेळ आमच्यावर यावी हेच आमचे दुर्दैव की भाग्य समजावे हेच कळत नाही.

## झरोका

एक - लोकहिताची राज्य शासनाची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची लाडकी बहीण कार्यान्वित झाली पण तीस घोडा घालणाऱ्यांना कोल्हापुरी जोडा दाखवा असे विधान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केल्याने उलट सुलट चर्चा होताना दिसते आहे. यातील गुपित काय ते कळतच नाही. डोकं बधीर झाले.

दुसरा - अरे, राजकारण-सत्ताकारणात असे विरोधाभासी विधाने होतच असतात ज्यावेळी भाजपा-सेना एकत्र नव्हती त्यावेळी हीच मंडळी काँग्रेसला जोडे दाखवीत होती. पुन्हा भाजपा-शिवसेनेत फूट पडली त्यावेळी ठाकरे-शिंदे यांनी फडणवीस यांना जोडे दाखविले परंतु सत्ता सावली बदलली आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री बनले ठाकरेचे बिन

सले म्हणून शिंदे हेच ठाकरे यांना कोल्हापुरी दाखवीत आहेत त्यात नवल कसले.

एक - अहो, पण जुने नाते संबंध असतानाच की त्यास नाकारणे वगैरे कालानुरुप -स्वार्थापोटी असले तरी असे खालच्या पातळीवर बोलणे योग्यच वाटते म्हणून बोलतो आहे.

दुसरा - अरे, राजकारणात-सत्ताकारणात कोणी-कोणाचा सख्खा, दुजा, नात्या-गोत्याचा, विश्र्वासू-दगाबाज असे काहीच नसते, शत्रु-मित्र हे एक होतात तर कधी दुश्मन बनून एकमेका विरुद्ध बोलतात. निवडणुका लढतात त्यातलाच हा प्रकार आहे तू कशाला काळजी करतोस.

एक - अहो, राजकारण-सत्ता कारण असले तरी वैयक्तिक नात्यावर असे हिंतोडे उडविणे चुकीचे-घातकी वाटते म्हणून वाईट वाटते दुसरे काय.

दुसरा - अरे, काही चिंता करू नकोस, कोल्हापुरीच काय, सोलापुरी-लातूर, नांदेड सारे एकत्रित होऊन इंद्रायणीतील देवेंद्र-नरेंद्रच्या डोक्यात महादेवाचे पाणी टाकून सारे वैभव रामाच्या हातून रावणाच्या हाती देतील त्यावेळी कोल्हापुरी मुंबईच्या ठाकरेची भेळपुरी झालेली दिसेल समजले.

## काय बोलता राव ?

मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाच्या हक्काला वाचा फोडण्यासाठी आरक्षण लागू केले होते परंतु २०१८ साली मराठा आरक्षणाचा कायदा अधिकार नसतानाही तो तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी लागू केला आणि आज घडीला मराठा समाजाच्या आरक्षणाचे गंडातर आले असे स्पष्टीकरण मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीनंतर माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी पत्रकारांशी संवाद साधताना केले

**काय बोलता राव,**

अरे, मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण द्यावे अशी मागणी होती आहे परंतु आजवर माझी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट झाली नव्हती ते भेटायला आले होते भेट झाली तित राजकारण-आरक्षण-वगैरे विषयावर चर्चा झाली नाही ती केवळ औपचारिक होती असे जरांगे पाटील यांनी स्पष्ट केल्याने पृथ्वीराज चव्हाण यांचा देवेंद्र फडणवीस यांच्यावरचा फुसका बार ठरतो की काय ते तुम्हीच बोला दाजीबा !

## 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' महिलांचा सन्मान वाढविणारी योजना - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

यवतमाळ, : गेल्या दोन महिन्यात महिलांसाठी



विविध निर्णय घेतले. महिलांची समाजात, कुटुंबात भागिदारीसह त्यांचा 'सन्मान' वाढविण्यासाठी आपण 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी आतापर्यंत एक कोटी ४० लाख महिलांनी नोंदणी केली. त्यापैकी एक कोटी ७ लाख बहिणींच्या खात्यात रक्कम देखील जमा केली आहे. राज्यातील शेवटच्या बहिणीचा अर्ज सादर होईपर्यंत नोंदणी सुरुच राहील, असे यवतमाळ येथे लाडक्या बहिणींशी संवाद साधतांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. मुख्यमंत्री महिला सशक्तीकरण अभियानांतर्गत लाडकी बहीण योजनेच्या प्रचार-प्रसारासाठी येथे आयोजित वचनपूर्ती मेळाव्यात मुख्यमंत्री श्री.शिंदे बोलत होते. जिल्हाभरातून ५० हजारावर लाडक्या बहिणी मेळाव्यास उपस्थित होत्या. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांचे कार्यक्रमस्थळी आगमण झाल्यानंतर लाडक्या बहिणींनी त्यांना राखी बांधून वचनपूर्तीनिमित्त त्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री संजय राठोड, आ.भावना गवळी, आ.किरण सरनाईक, आ.मदन येरावार, आ.प्रा.डॉ. अशोक उईके, आ.डॉ.संदीप धुर्वे, आ.संजीवरेड्डी बोदकुरवार, आ.नामदेव ससाणे, आ.इंद्रनिल नाईक, जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार पत्की आदी उपस्थित होते. काही दिवसांपूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने महिलांचा महासागर यवतमाळ येथे पाहिला होता. आज देखील स्त्रीयांची विराट शक्ती दिसून येत आहे. या शक्तीला वंदन करण्यासाठी यवतमाळ येथे आलो आहे. ज्या बहिणींची अद्यापही नोंदणी झाली नाही त्यांची नोंदणी करून त्यांना एकाचवेळी तीन महिन्यांची रक्कम देऊ. प्रत्येक पात्र महिलेची नोंदणी करण्याचे आपले लक्ष्य आहे. योजना सुरळीत सुरु राहण्यासाठी वर्षभरासाठीच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मुलींना उच्च शिक्षण घेता यावे, यासाठी शंभर टक्के मोफत शिक्षण देण्याचा निर्णय आपण घेतला.

# मुख्यमंत्री वयोश्री योजनेमुळे ज्येष्ठ नागरिकांचे जीवन सुखकर बनण्यास होणार मदत

**'प्रत्येकी तीन हजार रुपयांचे मिळणार सहाय्य**

मनः स्वास्थ केंद्र, योगोपचार केंद्र आदीद्वारे ज्येष्ठ नागरिकांचे मानसिक तथा कौटुंबिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांना वयोमानपरत्वे भेडसावणाऱ्या आरोग्यविषयक विविध समस्यांवर मात करुन त्याचे जीवनमान सुखकर करण्यासाठी राज्यातील ६५ वर्षे वय व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांसाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' राबविण्यात येत आहे.

ज्येष्ठ नागरिकांना विविध आजारपणाचा सामना करावा लागतो. केंद्र शासनाने सुरू केलेल्या योजनेच्या धर्तीवर दारिद्र्य रेषेखालील (बीपीएल) संबंधित दिव्यांग, दुर्बलताग्रस्त ज्येष्ठ नागरिकांना शारीरिक अक्षमतेनुसार सहाय्य साधने, उपकरणे पुरविण्यासाठी 'मुख्यमंत्री वयोश्री योजना' सुरू करण्यात आली आहे.

*असे आहे योजनेचे स्वरूप*

ज्येष्ठ नागरिकांना चष्मा, श्रवणयंत्र, ट्रायपॉड स्टिक, व्हीलचेअर, फोल्डिंग वॉकर, कमोड खुर्ची, नी- ब्रेस, लंबर बेल्ट, सर्वाइकल कॉलर आदी सहाय्यभूत साधने, उपकरणे खरेदी करता येणार आहेत. मानसिक स्वास्थ्य अबाधित ठेवण्यासाठी योगोपचार आदीचा लाभ घेता येईल. या योजनेकरिता राज्य शासनातर्फे १०० टक्के अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार असून पात्र लाभार्थ्यांना एकवेळ एकरकमी ३ हजार रुपयांच्या लाभ देण्यात येणार आहे. केंद्र शासनाच्या कार्मिक विभाग तसें राज्य शासनाद्वारे नोंदणीकृत योगोपचार केंद्र, मनः स्वास्थ केंद्र, मनशक्ती केंद्र, प्रशिक्षण केंद्राचा ज्येष्ठ नागरिकांना लाभ घेता येणार आहे.

*लाभार्थ्यांच्या पात्रतेचे निकष*

ज्या नागरिकांची ३१ डिसेंबर २०२३ अखेर वयाची ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे नागरिक या योजनेकरिता पात्र समजण्यात येतील. ज्या व्यक्तींचे वय ६५ वर्षे आणि त्याहून अधिक आहे त्या व्यक्तींकडे आधार कार्ड असणे आवश्यक आहे किंवा आधार कार्डसाठी अर्ज केलेला असावा आणि आधारकार्ड नोंदणीची पावती असणे आवश्यक आहे. लाभार्थ्यांकडे आधार कार्ड नसल्यास ओळख पटविण्यासाठी इतर स्वतंत्र ओळख दस्तऐवजही ग्राह्य धरण्यात येणार येईल.

लाभार्थ्याचे कौटुंबिक वार्षिक उत्पन्न २ लाख रुपयाच्या आत असणे आवश्यक असून याबाबत लाभार्थ्याने स्वयंघोषणापत्र सादर करावे. निवड किंवा निश्र्चित केलेल्या जिल्ह्यात एकूण लाभार्थ्यांच्या संख्येपैकी ३० टक्के महिला असणार आहे. अर्जदारांने मागील ३ वर्षात स्थानिक स्वराज्य संस्था आणि सरकारद्वारे नियंत्रित सार्वजनिक उपक्रमांसहित कोणत्याही सरकारी स्रोतांकडून तेच उपकरण विनामूल्य प्राप्त केले नसल्याबाबतचे स्वयंघोषणापत्र सादर करावे लागेल. मात्र दोषपूर्ण, अकार्यक्षम उपकरणे आदीच्या बदलीला अपवाद म्हणून परवानगी दिली जाऊ शकते.

पात्र लाभार्थ्यांच्या बँकच्या खात्यात ३ हजार रुपये जमा झाल्यावर विहीत केलेली उपकरणे खरेदी केल्याचे देयक तसेच मनःस्वास्थ केंद्राद्वारे प्रशिक्षण घेतल्याचे लाभार्थ्यांचे प्रमाणपत्र ३० दिवसांच्या आत संबंधित सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण यांच्याकडून प्रमाणित करुन घ्यावे. संबंधित केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्थेमार्फत विकसित पोर्टलवर ३० दिवसांच्या आत अपलोड करावे.

*अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे*

आधारकार्ड, मतदान कार्ड, राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, पासपोर्ट आकाराचे २ छायाचित्रे, स्वयंघोषणापत्र, शासनाने ओळखपत्र पटविण्यासाठी विहीत केलेली अन्य कागदपत्रे योजनेचे लाभ घेण्यासाठी आवश्यक असणार आहे.

*योजनेची अंमलबजावणी*

लाभार्थ्यांची निवड करणे, लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची तपासणी करणे, लाभार्थ्यांचे आधार क्रमांक, बँक खाते यांची माहिती गोळा करणे आदी कामे नोडल एजन्सी, केंद्रीय सामाजिक उपक्रम संस्था यांच्या माध्यमातून आयुक्त समाजकल्याण, पुणे यांच्याद्वारे करण्यात येणार आहे. तसेच लाभार्थ्यांची निवड, योजनेची अंमलबजावणी आणि देखरेख करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागाकरिता जिल्हाधिकारी व शहरी भागाकरिता महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य तपासणीद्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. ही योजना वृद्धापकाळातील आरोग्यविषयक समस्या दूर करून आनंदी जीवन जगण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

६५ वर्षे व त्यावरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहेत.

*लातूर जिल्ह्यात आतापर्यंत ३२ हजार अर्ज प्राप्त*

मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी अर्ज स्विकारण्याची कार्यवाही लातूर जिल्ह्यात सुरू आहे. या अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातून आतापर्यंत सुमारे ३२ हजार ६३ अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेण्यासाठी ग्रामस्तरीय अधिकारी, कर्मचारी यांनी ज्येष्ठ नागरिकांना माहिती देवून अर्ज भरण्यासाठी सहकार्य करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.

***संकलन :- जिल्हा माहिती कार्यालय, लातूर***

# आजही गोकुळात नांदतों हरी !

'आज गोकुळात रंग खेळतो हरी राधिके, जरा जपून जा तुझ्या घरी' भगवान श्रीकृष्णाचा जन्म ज्या दिवशी झाला तो दिवस जन्माष्टमी म्हणून ओळखला जातो. यालाच गोपालकाला, दहीकाला, दहीहंडी असे देखील म्हटले जाते. पारंपरिक हिंदू धारणेनुसार श्रीकृष्ण हा हिंदूचा आठवा अवतार मानला जातो. श्रावण महिन्यातील सण यांचे हिंदू धर्मात फारच महत्व आहे श्रावण महिन्याच्या कृष्ण अष्टमी तिथीला श्रीकृष्णाचा जन्म झाला. कृष्ण हा देवकी आणि वासुदेव अनकदुंदुभी यांचा पुत्र आहे. त्यांचा जन्मदिवस हिंदू लोक जन्माष्टमी म्हणून साजरा करतात. विशेषतः गौडीया वैष्णव परंपरेमध्ये कृष्णाला सर्वोच्च देव मानले जाते. हिंदू परंपरेनुसार भाद्रपद महिन्याच्या आठव्या दिवशी मध्यरात्री मथुरेत कृष्णाचा जन्म झाला असे मानले जाते. या दिवशी जन्माष्टमी साजरी केली जाते. कृष्णाचा जन्म अराजकाच्या प्रदेशात झाला. तो असा काळ होता जेव्हा छळ मोठ्या प्रमाणावर होता, लोकांचे स्वातंत्र्य नाकारले गेले होते, सर्वत्र वाईट गोष्टी होत्या आणि राजा कंस या त्याच्या मामाकडून त्याच्या जीवाला धोका होता. जन्मानंतर लगेचच कृष्णाचे वडील वासुदेव अनकदुंदुभी यांनी त्याला यमुना ओलांडून मथुरेतून गोकुळात पालनपोषण करण्यासाठी नेले. वासुदेवाचा भाऊ नंद आणि वहिनी यशोदा हे कृष्णाचे पालक होते. कृष्णासोबतच त्याचा मोठा भाऊ म्हणून बलराम देखील अवतार घेऊन पृथ्वीवर आला होता, जो वासुदेवाची पहिली पत्नी रोहिणीचा मुलगा होता . ही आख्यायिका जन्माष्टमीला लोक उपवास करून, कृष्णप्रेमाची भक्तिगीते गाऊन आणि रात्री जागरण करून साजरी करतात. कृष्णाच्या मध्यरात्रीच्या जन्मानंतर, कृष्णाच्या बाळाच्या रूपाला (बाळकृष्ण)आंघोळ घालण्यात येते, कपडे घातले जातात, नंतर पाळण्यामध्ये ठेवले जाते. त्यानंतर भक्त हे अन्न आणि मिठाई वाटून उपवास सोडतात. स्त्रिया त्यांच्या घराच्या दाराच्या बाहेर आणि स्वयंपाकघराबाहेर लहान पावलांचे ठसे आढळतात आणि त्यांच्या घराकडे चालत जातात. हे कृष्णाच्या त्यांच्या घरातील प्रवासाचे प्रतीक आहे.

गोकुळ अष्टमीच्या दिवशी उपवास करण्याची प्रथा आहे. गुजराथमध्ये 'सातम' म्हणजे सप्तमीच्या दिवशी पैसे लावून किंवा तसेच दिवसभर पत्ते खेळतात. रात्री बारा वाजता पत्ते बंद करून कृष्णजन्माचा उत्सव सुरू करतात. मध्य प्रदेशात आणि उत्तरी भारताच्या बऱ्याचशा भागात पौर्णिमान्त महिना असलेले पंचांग वापरात असल्याने या दिवशी त्यांची भाद्रपद कृष्ण अष्टमी येते. या दिवशी कित्येकांच्या घरी गोकुळ-वृंदावनाचा देखावा तयार करून जन्मोत्सव साजरा करतात. वैष्णव लोक तर हा दिवस विशेष भक्तीने पाळतात. वृंदावन येथे या दिवशी दोलोत्सव असतो. याच दिवशी कृष्णाच्या आयुष्यातील महत्त्वाची संकल्पना रासलीलाचे सादरीकरण केले जाते. मणिपूर येथे दिवसभर उपवास करून रात्री कृष्णाची पूजा केली जाते. हनुमान मंदिर, गोविंदजी मंदिर येथे विशेष पूजा होते, जत्रा भरते, लोक उत्सवाचा आनंद घेतात. हा उत्सव भारतात सर्वत्र होतो. हा सण विशेषतः मथुरा आणि वृंदावन तसेच वैष्णव आणि गैर-सांप्रदायिक समुदाय आढळणाऱ्या मणिपूर, आसाम, बिहार, पश्र्चिम बंगाल, ओडिशा, मध्य प्रदेश, राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, कर्नाटक, केरळ, आंध्र प्रदेश, तामिळनाडू येथे साजरा केला जातो. याशिवाय भारतातील इतर सर्व राज्ये आणि उमरकोट, थारपारकर, मीरपूरखास आणि संपूर्ण सिंध पाकिस्तानमध्ये देखील हा उत्सव साजरा केला जातो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका,जगन्नाथ पुरी या ठिकाणी वैष्णव संप्रदायाचे वैशिष्ट्य असलेली मंदिरे असल्याने तो मोठ्या प्रमाणावर साजरा होतो. ओरिसामध्ये दहीहंडी जत्रा किंवा दहीभंगा जत्रा या दिवशी साजरी केली जाते. अष्टमीच्या दिवशी एकभुक्त राहून पांढऱ्या तिळाचा कल्क अंगाला लावून स्नान करतात. व्रताचा संकल्प करून देवघर लता पल्लवानी सुशोभित करतात. त्या स्थानी देवकीचे सूतिकागृह स्थापन करतात. मंचकावर देवकी आणि कृष्ण यांच्या मूर्तीची स्थापना करतात. दुसऱ्या बाजूला यशोदा आणि तिची नवजात कन्या, वसुदेव, नंद यांच्या मूर्ती बसवितात. सप्तमीच्या मध्यरात्री शुचिर्भूत होऊन संकल्प करतात व सपरिवार श्रीकृष्णाची षोडशोपचार पूजा करतात. रात्रौ कथा, पुराण, नृत्य,गीत इ. कार्यक्रमांनी जागरण करतात. अष्टमीच्या दिवशी उपवास करतात व देवालाही फराळाच्या जिन्नसांचा नैवेद्य दाखवितात. नवमीच्या दिवशी पंचोपचार करून उत्तरपूजा करून महानैवेद्य समर्पण करतात. पूजा झाल्यानंतरचे कृत्य अग्नी पुराणात सांगितले ते असे आहे. याप्रमाणे पूजा करून पुरुषसूक्ताने, विष्णूसूक्ताने व इतर स्तोत्रांनी स्तवन करावे. वाद्यांचा घोष, गीतांचे मंगल स्वर, पुराण-इतिहासातील निरनिराळ्या सत्यकथा ऐकत ती रात्र घालवावी. गोकुळातील कृष्णजन्माच्या लीला श्रवण केल्यानंतर वैष्णवांनी परस्परांवर दही इ. चे सिंचन करावे. कारण 'गोपाळांनी दही, दूध, तूप, उदक यांनी परस्परांवर सिंचन व लेपन केले' असे भागवतामध्ये वचन आहे, त्यावरून असा विधी प्राप्त होतो. कृष्णाला लोणी आणि साखर एकत्र करून त्याचा प्रसाद दिला जातो. उत्सवासाठी तयार केल्या जाणाऱ्या विशिष्ट प्रसादास गोपालकाला असे म्हणतात. कृष्ण जयंतीचा उत्सव भारतात सर्वत्र साजरा होतो. महाराष्ट्रात विशेषतः कोकणात या उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवशी दहीकाला होतो व त्याचे सेवन करून उपवास सोडला जातो. गोविंदा आला रे आला । गोकुळात आनंद झाला ।। असे गाणे गात अनके लहानथोर पुरुष घरोघरी नाचायला जातात व दहीहंडी फोडतात. कित्येक ठिकाणी गोपाळकाला करून कृष्ण चरित्रातील सोंगे आणण्याचाही प्रघात आहे. या दिवशी महाराष्ट्रात, विशेषतः मुंबईत, उंच मडक्यात दही-दुधाने भरलेला हंडा ठेवून तेथपर्यंत मानवी मनोऱ्यावरून पोहचून तो हंडा फोडण्याचा 'गोविंदा' हा साहसी खेळ होतो.

गोपाल म्हणजे गायीचे पालन करणाऱ्या कृष्णाच्या या जन्मोत्सवाच्या निमित्ताने काल्याचा प्रसाद केला जातो. काला म्हणजे एकत्र मिळविणे. पोहे, ज्वारीच्या लाह्या, धानाच्या लाह्या, लिंबू व आंब्याचे लोणचे, दही, ताक, चण्याची भिजविलेली डाळ, साखर, फळांच्या फोडी इत्यादी घालून केलेला एक खाद्यपदार्थ. हा कृष्णास फार प्रिय होता असे मानले जाते. श्रीकृष्ण व त्याचे सवंगडी मिळून यमुनेच्या तीरावर हा तयार करीत असत व वाटून खात असत असे मानले जाते. गोमंतकात याच काल्याला गवळणकाला म्हणतात. हा काला तिथल्या कलावंतिणी करतात. त्यात एका मुलीला कृष्णाचे सोंग देऊन कृष्णलीलेची गाणी म्हणतात. शेवटी कृष्णाकडून दहीहंडी फोडवितात. हा गवळण काला दशावतारी खेळानंतर किंवा देवस्थानाचा रथोत्सव झाल्यानंतर होतो.

हा महाराष्ट्रातील एक वैष्णव नृत्योत्सव आहे. श्रीकृष्णाने व्रज मंडळात गाई चारताना आपण व आपले सवंगडी या सर्वांच्या शिदोऱ्या एकत्र करून त्या खाद्य पदार्थांचा काला केला व सर्वांसह त्याचे भक्षण केले अशी कथा आहे. या कथेला अनुसरून गोकुळाष्टमीच्या दिवशी एका सजवलेल्या मडक्यात काला करून ते दोरीच्या सहाय्याने उंचावर बांधण्याची व मानवी मनोरे रचून ती दहीहंडी फोडण्याची प्रथा आहे. जास्तीत जास्त उंचीवर जाऊन हंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकाला आकर्षक बक्षीस दिले जाते. यावेळेस गाणी, नृत्य, विविध कार्यक्रम होतात व बघणाऱ्यांची जल्लोषासहित मोठी गर्दी जमलेली असते.

हाथी घोडा पालखी जय कन्हैया लालकी...

गोकुळाष्टमीच्या निमित्ताने श्रीकृष्णाची कृपा तुमच्यावर आणि कुटुंबावर कायम राहो. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या हार्दिक शुभेच्छा !

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**
ई-मेल : pravinbagdegmail.com

# खरोळा येथील देवीच्या मंदिरासमोर सभागृहाच्या बांधकामाचा ऋषिकेश कराड यांच्या हस्ते शुभारंभ

लातूर - भारतीय जनता पार्टीचे नेते विधान परिषदेचे सदस्य आ. रमेशआप्पा कराड साहेब यांच्या स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात सभागृह बांधकामासाठी दहा लक्ष रुपयाचा निधी देण्यात आला असून या सभागृह बांधकामाचा भूमिपूजन भाजपाचे युवा नेते मा. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या आणि भक्तीमय वातावरणात झाला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील गावागावात वाडी वस्तीत भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून अनेक विकास कामांना विविध योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात निधी मिळाला. मिळालेल्या निधीतून विकासाची



कामे सर्वत्र होत आहेत त्याचाच एक भाग स्थानिक आमदार विकास निधीतून खरोळा येथील वडाची देवी मंदिर परिसरात भाविकांच्या मागणीनुसार सभागृह बांधकामासाठी १० लाख रुपयांचा निधी आ. कराड साहेब यांनी मंजूर केला. सदरील सभागृह बांधकामाचा शुभारंभ भाजपाचे युवा नेते माननीय ऋषिकेश दादा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आला.

खरोळा येथील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री दत्त मंदिर देवस्थानास आमदार रमेश आप्पा कराड साहेब यांनी ग्रामीण तीर्थक्षेत्र विकासाचा 'ब' दर्जा मिळवून दिल्याने या मंदिर परिसरात विविध विकास कामाबरोबरच भाविक भक्तांना मोठ्या प्रमाणात सोयी सुविधा उपलब्ध होतील असे सांगून यावेळी बोलताना ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील विकासाला खऱ्या अर्थाने आ. रमेश आप्पा कराड साहेब यांच्या माध्यमातून गती मिळाली असल्याचे बोलून दाखविले.

यावेळी भाजपा पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, सांगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमुडे, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमर चव्हाण, माजी जिप सदस्य सुरेंद्र गोडभरले, रमाकांत फुलारी, बाळाप्पा हेणे, बालाजी मानमोडे, हनुमंत राऊतराव, मोहन राऊतराव, राजकुमार मानमोडे, ज्ञानोबा भोपी यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी आणि भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



माजलगाव (प्रतिनिधी)बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे हे युरोप अभ्यास दौरा पूर्ण करून आल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरीनाना मोरे, संघटनेचे ज्येष्ठ नेते नवनाथ धायजे,भीमराव टाकणखार,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष शेख फिरोज,तालुकाध्यक्ष प्रदीप पट्टेकर यांची उपस्थिती होती.

## महिला,मुलींना स्वरक्षणासाठी शस्त्र परवाना द्या - ॲड.कांडुरे

माजलगाव,(प्रतिनिधी) : देशभरातील महिलांच्या सुरक्षेसाठी असलेला महिला आयोग,महिला संरक्षण,सबलीकरण,सशक्तीकरण,नुसते नावालाच का?प्रशासन व सरकार संरक्षण देत नसेल तर महिलांना शस्त्र परवाना द्या,अशी मागणी ॲड.आरतीताई अविनाश कांडुरे/गाडेकर यांनी केली आहे.



प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की,बदलापूर प्रकरणामुळे देश हादरला असुन सर्वत्र अशा घटना घडत आहेत. त्यामुळे पोलिस प्रशासन,शासन काय करतेय? आज घडीला महिला सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत.ही अभिमानाची गोष्ट आहे,परंतु बलात्कार, अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे.भारतीय संस्कृतीमध्ये महिलांना असलेला मान,सन्मान या घटनांमुळे राहत नाही. इतर देशात बलात्काराच्या कायद्यासाठी कडक शासन केले जाते.परंतु भारत देशामध्ये मात्र कडक कारवाई होत नाही.त्यामुळे वारंवार अशा घटना घडतांना दिसतात. परंतु शासन अथवा पोलिस प्रशासन बलात्कारा सारख्या गंभीर गुन्ह्यातील आरोपींवर तात्काळ कारवाई करत नाहीत.त्यामुळे महिला आयोग,महिला संरक्षण, सबलीकरण,सशक्तीकरण,नुसते नावालाच का? प्रशासन व सरकार संरक्षण देत नसेल तर महिलांना शस्त्र परवाना द्या,अशी मागणी ॲड. आरतीताई अविनाश कांडुरे/गाडेकर यांनी केली आहे.

## बदलापूर प्रकरणी विरोधकांच्या दुटप्पी भूमिकेच्या निषेधार्थ भाजपातर्फे आदोलन

मुंबई : बदलापूर घटनेतील पीडितेला न्याय मिळवून



देण्यासाठी तसेच महिला अत्याचार प्रकरणात महाविकास आघाडीच्या नेत्यांची दुटप्पी भूमिका उघड करण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने राज्यभरात ठिकठिकाणी शनिवारी धरणे आंदोलन करण्यात आले. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मुंबई अध्यक्ष आ. आशीष शेलार, महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ,आ. प्रवीण दरेकर, आ. प्रसाद लाड आदी नेत्यांनी यात सहभाग घेतला. बदलापुरात घडलेल्या दुर्दैवी घटनेतील पीडित कुटुंबीयांबद्दल यावेळी संवेदना व्यक्त करण्यात आल्या.

मुंबई भाजपा अध्यक्ष आशिष शेलार, भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांच्या नेतृत्वाखाली भर पावसात मुंबईतील मादाम कामा रोड येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ मविआ नेत्यांचा निषेध करणारे फलक हाती घेऊन आंदोलन करण्यात आले. यावेळी ठाकरे सरकारच्या कार्यकाळात राज्यात विविध ठिकाणी घडलेल्या महिला अत्याचाराच्या घटनांबद्दल देखील बोला, अशा आशयांचे फलक घेऊन उद्धव ठाकरे, शरद पवार ,सुप्रिया सुळे, नाना पटोले ,विजय वडेटटीवार, अंबादास दानवे, जयंत पाटील यांना लक्ष्य करण्यात आले. या वेदनादायी प्रसंगात घाणेरडे राजकारण करत मविआ चे नेते आत्ता संस्कृती विरुद्ध विकृती असा नारा देत आहेत.मात्र महिला सुरक्षा, महिला सन्मानाचा बुरखा कशाला पांघरताय असा परखड सवाल श्रीमती वाघ यांनी केला. मविआ सरकारने महिला अत्याचाराच्या प्रकरणांमध्ये न्याय देण्यासाठी काहीही केले नव्हते याची आठवण आम्ही आंदोलनाच्या माध्यमातून करून दिली असेही श्रीमती वाघ यांनी स्पष्ट केले.

विधानपरिषद गट नेते आ. प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वात महाड मधील चवदार तळे येथे आंदोलन करण्यात आले. यावेळी श्री. दरेकर यांनी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना अडीच वर्षांच्या कालावधीत राज्यात घडलेल्या महिला अत्याचाराच्या अनेक घटनांचा उल्लेख केला. आ. दरेकर म्हणाले की, दिशा सालियान च्या संशयास्पद मृत्यूचे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न मविआ सरकारने केला होता. संभाजी नगर येथे शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा युवा काँग्रेस अध्यक्ष मेहबूब शेख याने महिलेवर लैंगिक अत्याचार केले तेव्हा साधा एफआयआरही दाखल केला गेला नाही. त्यावेळी आम्ही कधीच राजकारण केले नाही. २००४ ते २०१४ या दरम्यान युपीए सरकारच्या कार्यकाळात देशात झालेल्या महिला अत्याचाराच्या दुर्दैवी घटनांची लांबलचक यादी असताना मविआचे नेते आता मात्र निर्लज्जपणे बदलापूर घटनेमध्ये राजकीय पोळी भाजत आहेत असेही श्री.दरेकर यांनी नमूद केले. या आंदोलनात जिल्हा सरचिटणीस बिपीन म्हामुणकर, जिल्हा उपाध्यक्ष जयवंत दळवी, मंजुषा कुद्रुमुती, मंजुषा जोशी, निलेश देवगीरकर आदी सहभागी झाले होते. आ. प्रसाद लाड यांच्या नेतृत्वाखाली मुंबईतील सायन सर्कल येथे झाशीची राणी लक्ष्मीबाई पुतळ्याजवळ धरणे आंदोलन करण्यात आले.

# स्वत: सोबत इतरांचा आदर करा, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई



लातूर : आपल्याला निरोगी, सुदृढ, सक्षम आणि आनंदी जीवन जगायचे असेल तर स्वतःसोबत इतरांचा आदर केला पाहिजे असे प्रतिपादन महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, लातूरचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी केले.

महाराष्ट्र असोसिएशन ऑफ सोशल वर्क एज्युकेटर्स (मास्वे) आणि महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालय, समाजकार्य विभागातर्फे समाजकार्य पंधरवडा अंतर्गत शिव्या मुक्त अभियान या कार्यक्रमांतर्गत इतरांचा आदर.... महिलांचा सन्मान या विषयावरील समारोप समारंभ महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये संपन्न झाला यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.

यावेळी विचारमंचावर प्रा. काशिनाथ पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा. भाग्यश्री भुजबळ, आणि प्रा. प्रकाश राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्र्वर यांच्या प्रतिमेला सर्व मान्यवरांनी अभिवादन केले.

पुढे बोलताना प्राचार्य प्रभारी डॉ. गवई म्हणाले की, आज आपण सर्वांनी व्यावसायिक समाजकार्याच्या अभ्यासाच्या माध्यमातून समुदाय शिव्यामुक्त झाल्याने समृद्ध आणि लोकशाही राष्ट्र निर्माण होईल. आपण एक उत्कृष्ट व्यावसायिक समाजकार्यकर्ता बनाल. महाराष्ट्रातील सर्व समाजकार्य महाविद्यालये आणि मास्वे संघटनेने समाजकार्य पंधरवड्याच्या माध्यमातून शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या अंतर्गत राबविण्यात आलेल्या विविध १४ उपक्रमाची माहिती देऊन याद्वारे खऱ्या अर्थाने आपल्या देशात सौंदर्यपूर्ण वातावरण निर्माण होण्यास मदत होईल असे सांगून त्यांनी मासवे संघटनेचे मनः पूर्वक अभिनंदन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. काशिनाथ पवार यांनी केले. तर आभार प्रा. भाग्यश्री भुजबळ यांनी मानले.

या कार्यक्रमात अनिल मुंडे, माने आकांक्षा, अंजली गर्जे, काळे शिवानी, प्रशांत सुरवसे या विद्यार्थ्यांनी शिव्या मुक्त अभियान, इतरांचा आदर, महिलांचा सन्मान या उपक्रमाविषयी विविध क्षेत्रकार्य संस्था व समुदायात घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा आपल्या मनोगत आतून व्यक्त केला.

या कार्यक्रमाला समाजकार्य विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वात शेवटी सामूहिक राष्ट्रगीताने समाजकार्य पंधरवाडा या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. दिनेश मौने, प्रा. नागेश जाधव, प्रा. दत्ता करंडे, नंदू काजापुरे, बालाजी डावकरे, संतोष येचेवाड, आनंद खोंपे यांनी परिश्रम घेतले.

# भव्य व्यापारी संकुलासाठी १० कोटींचा निधी मंजूर...

औसा – औसा शहरातील पालिकेच्या आरक्षित जागेवर झालेले सर्व अतिक्रमण काही महिन्यांपूर्वी काढण्यात आले होते. दरम्यान शहरातील रस्ते विकास व दळणवळणाच्या दुष्टीने केलेल्या या कारवाईनंतर विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे पुनर्वसन करण्याचा शब्द आ अभिमन्यू पवार यांनी दिला होता. याचीच पूर्तत म्हणून पहिल्या टप्प्यात औसा न्यायालया समोरील पालिकेच्या आरक्षित जागेवर १० कोटी रुपये खर्चून भव्य व्यापारी संकुल उभारले जाणार असून अतिक्रमण मोहिमेतील विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे या माध्यमातून पुनर्वसन केले जाणार आहे.

औसा शहराची लोकसंख्या ५० हजारांच्या वर गेली आहे. शाळा, कॉलेज, शासकीय काम व खरेदी – विक्री इ. कारणांसाठी शहरात दररोज येणाऱ्या नागरिकांची संख्याही मोठी आहे. शहर अतिक्रमणाच्या विळख्यात अडकल्याने या हजारो नागरिकांना, वाहनचालकांना दररोज त्रास होत होता. शहर अतिक्रमणमुक्त करण्यासाठी शहर प्रशासनाच्या वतीने शहरात अतिक्रमणे काढण्यासाठी काही महिन्यांपूर्वी मोहीम राबविली गेली. पण या कारवाईमुळे काही लहान मोठ्या व्यवसाय करणाऱ्या



कुटुंबांपुढे अडचणी निर्माण झाल्या अडचणीत आलेल्या लहान मोठ्या व्यवसाईकांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने आ अभिमन्यू पवार यांनी औसा शहरातील कोर्टासमोरील आरक्षित शासकीय जमिनीवर भव्य व्यापारी संकुल उभारण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत १० कोटी रु. निधी मंजूर करून घेतला असून मागे शहरात प्रशासनाच्या वतीने राबविण्यात आलेल्या अतिक्रमणमुक्त औसा शहर अभियानात विस्थापित झालेल्या लहानमोठ्या व्यापाऱ्यांचे आणि दुकानदारांचे व्यापारी गाळ्याच्या माध्यमातून हक्काच्या जागेत पुनर्वसन करता येणार आहे. पहिल्या टप्प्यात भव्य व्यापारी संकुलासाठी १० कोटींचा निधी मंजूर झाला असून या निधीतून सहा महिन्याच्या आत भव्य व्यापारी संकुल उभारले जाणार असून यामध्ये प्राधान्याने अतिक्रमण मोहिमेतील विस्तापित लहान मोठया व्यवसाईकांचे पुनर्वसन केले जाणार आहे. यानंतरही वेगवेगळ्या योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून त्या माध्यमातून आणखी व्यापारी संकुल उभारले जाणार असून औसा शहराच्या व्यवसाय विकासासाठी हि एक मोठी उपलब्धी ठरणार आहे.

या दोन वर्षांच्या कालावधीत आ अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे औसा शहराच्या विकासासाठी चारशे कोटींच्यावर निधी प्राप्त झाला असून या निधीतून शहराच्या विविध भागात विकासकामे पूर्ण होताना दिसत आहे. एकंदरीत आता व्यापारी संकुल उभारणीतून शहराच्या व्यवसायात वाढ होणार आहे. सदरील निधी मंजूरीबद्दल आ अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार व लातूरचे पालकमंत्री गिरीश महाजन यांचे आभार मानले आहेत.

# मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील- ना. संजय बनसोडे

लातूर : मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून प्रयत्न सुरू आहेत. यासाठी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था म्हणजेच आर्टी संस्था स्थापन करण्यात आली आहे. उदगीर तालुक्यातही समाजाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे, असे क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी सांगितले.



उदगीर शहरातील लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळ्याजवळ उभारण्यात येणाऱ्या साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका इमारतीच्या भूमिपूजनप्रसंगी ना. बनसोडे बोलत होते. आमदार अमित गोरखे, सचिन साठे, उदगीरचे उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, गट विकास अधिकारी प्रवीण सुरडकर, नगरपरिषद मुख्याधिकारी सुंदर बोंदर, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष राहूल केंद्रे, बन्सीलाल कांबळे, अंबादास सगट यांच्यासह पदाधिकारी, नागरिक यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी ना. संजय बनसोडे यांच्यासह मान्यवरांचे फुलांच्या पाकळ्या उधळून स्वागत करण्यात आले. ना. बनसोडे यांच्या हस्ते कुदळ मारून इमारतीचे भूमिपूजन करण्यात आले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून या इमारतीसाठी १४ कोटी ९६ लाख रुपये निधी उदगीर नगरपरिषदेला उपलब्ध करून देण्यात आला आहे. तळ मजल्यावर पार्किंगची व्यवस्था असलेल्या या इमारतीमध्ये पहिल्या व दुसऱ्या मजल्यावर सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका असणार आहे.

मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात येत आहे. त्याचप्रमाणे चिराग नगरमध्ये लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे स्मारक उभारण्यात येणार आहे. तसेच पुणे शहरात वस्ताद लहुजी साळवे यांचे स्मारक होणार असून लवकरच त्याचे भूमिपूजन करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे म्हणाले.

उदगीर शहरात अतिशय मोक्याच्या जागेवर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृह, संग्रहालय आणि अभ्यासिका इमारतीची उभारणी होत आहे. याठिकाणी आणखी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी निधी कमी पडू देणार नाही. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यासाठी ५० लाख रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. पुतळा परिसर सुशोभीकरणासाठी आणखी ५० लाख रुपये निधी दिला जाईल, असे ना. बनसोडे यांनी सांगितले. तसेच जळकोट शहरात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा आणि भव्य सभागृह उभारण्यात आले आहे. उदगीर शहरात विविध ठिकाणी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे समाज भवन उभारण्यात आल्याचे ना. बनसोडे म्हणाले.

राज्य शासन सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करीत असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. पुढील काळात ही रक्कम दुप्पट करण्यात येणार असल्याचे ना. बनसोडे यांनी सांगितले.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्य शासन मातंग समाजाच्या विकासासाठी विविध योजना राबवित आहे. बार्टीच्या धर्तीवर सुरू करण्यात आलेल्या आर्टी संस्थेमुळे मातंग समाजातील युवकांना स्पर्धा परीक्षा, संशोधनासाठी मदत होवून समाजाचा विकास होईल, असे आमदार अमित गोरखे यांनी सांगितले.

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून सर्वसामान्य, कष्टकरी माणसाचे जीवन रेखाटले. या समाजाच्या विकासाबाबत चिंतन करून साहित्य निर्मिती केली. त्यांचे विचार प्रत्येकाने समजून घेवून कोणताही जातीभेद न मानता समाजासाठी काम करावे, असे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे वंशज सचिन साठे यावेळी म्हणाले.

प्रा. अंबादास सगट, रामचंद्र तिरुके, बन्सीलाल कांबळे, पप्पू गायकवाड यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. पंडीत सूर्यवंशी यांनी केले, शिवाजी देवताळे यांनी सूत्रसंचालन केले.

## कामाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी जन सन्मान पदयात्रा जनसन्मान पदयात्रेचा आ. सांभाजी पाटील निलंगेकर यांच्याकडून श्रीगणेशा

लातूर/प्रतिनिधी : निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार



संभाजी पाटील निलंगेकर यांच्या जन सन्मान पदयात्रेची सुरुवात शनिवारी (दि.२४ ) माकणी गावातून करण्यात आली.माकणीच्या जागृत हनुमान मंदिरात दर्शन घेऊन पदयात्रेस प्रारंभ झाला. गेल्या पाच वर्षांत केलेल्या विविध विकास कामांचा लेखाजोखा जनतेसमोर मांडण्यासाठी ही पदयात्रा असल्याचे त्यांनी यावेळी बोलताना म्हटले.ज्या पद्धतीने वारकरी पांडुरंगाची वारी करतात त्याचप्रकारे जनतेच्या रूपात ज्या पांडुरंगाला मी पाहतो,त्या मायबाप जनतेचा सन्मान करण्यासाठी येणारे १२ दिवस ३०० किलोमीटरचा पायी प्रवास करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

महिला भगिनींचा सामाजिक आणि आर्थिक स्तर उंचावण्यासाठी महायुती सरकारने मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर केली.यातून माता–

भगिनींना प्रतिमाह १,५०० रुपये देण्यात येत असून यामुळे महिलांचे आर्थिक सबलीकरण होणार आहे. त्याचबरोबर मुलींचे पदवीपर्यंतचे शिक्षण देखील सरकारने मोफत केले आहे.शेतकरी बांधवांच्या समृद्धीसाठी विशेष प्रयत्न केले. कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणला.कोयाची वाडी आणि चन्नाचीवाडी या दोन्ही वाड्या गेल्या अनेक वर्षापासून दुर्लक्षित होत्या.गेल्या काळात येथे सातत्याने विकास झाला असून आणखी बरीच विकासकामे प्रगतीपथावर आहेत.

आगामी काळातही विकासाची ही गंगा अशीच वाहत राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. या प्रसंगी शासकीय योजनेचे लाभार्थी ठरलेले गावकरी तसेच महिला भगिनींना प्रशस्तीपत्र देऊन सर्वांचा सन्मान करण्यात आला.

या जनसन्मान पदयात्रेवर विरोधकांकडून टीका केली जात आहे. टीका करण्याचे काम अगदी सोपे असल्यामुळे मी ते काम विरोधकांना दिले असल्याचे आ. निलंगेकर यांनी सांगितले. कोविडच्या काळात ज्यावेळी सर्व नेतेमंडळी घरात बसून होती त्यावेळी,हा संभाजीराव तुमच्या सेवेत होता,असेही त्यांनी सांगितले.दरम्यान आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या मातोश्री माजी खासदार रूपाताई पाटील निलंगेकर यादेखील जनसमान पदयात्रेस आशीर्वाद देण्यासाठी उपस्थित होत्या. आपण जीवन जगताना तसेच राजकीय आणि सामाजिक काम करताना कुठलाही बडेजाव करायचा नाही. जेणेकरून समोरून आलेल्या माणसाला आपण त्यांचा माणूस वाटलो पाहिजे,असे बाळकडू मी त्यांना दिल्याचे म्हणाल्या.

या प्रसंगी बसवकल्याचे आ. शरनू सलगर, भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख माजी आ. शिवाजीराव पाटील कव्हेकर माजी जि. प. अध्यक्ष राहूल केंद्रे, माजी सभापती संजय दोरवे, जिल्हा सरचिटणीस भारत चामे यांनी मनोगत व्यक्त करत आ. निलंगेकरांच्या विकासकामंचे व त्यांच्या करायचे कौतुक करत हे नेतृत्व मतदार संघातील जनतेने तळ हाताच्या फोडप्रमाणे जपावे असे आवाहन केले.

यावेळी आ.निलंगेकर यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.माकणीचे सरपंच तुकाराम सुर्यवंशी, चेअरमन,ग्रामपंचायत सदस्य यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

माकणी (थोर) येथे विविध विकास कामाचा आ.निलंगेकर यांच्या हस्ते नारळ फोडून शुभारंभ करण्यात आला.तेथून कोयाचीवाडी आणि चन्नाचीवाडी येथील नागरिकांनी गावात आगमन होताच पदयात्रेवर जेसीबीने पुष्पवृष्टी केली.गावात विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.

माकणी,कोयाचीवाडी चन्नाचीवाडी,सावरी,माने जवळगा शेळगी येथील लाडकी बहिण योजनेसाठी पात्र महिलांना आ.निलंगेकर यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

निलंगेकर संवाद साधणार आहेत.गाव,वाडी–वस्ती येथील नागरिक 'विकासाची वारी– जनतेच्या दारी' या पदयात्रेत सहभागी होऊन समर्थन देत आहेत.

निलंगा मतदारसंघात निघालेल्या जनसन्मान पदयात्रेस मराठा क्रांती मोर्चाच्या कार्यकर्त्यांनी जाहीर पाठींबा देत आ.संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या निघालेल्या पदयात्रेत सहभागी होऊन पाठींब्याचे पत्र दिले.

यावेळी बसवकल्याणचे आ.शरणूजी सलगर, माजी खा. सुनील गायकवाड,माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर,भाजपा जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,लातूर शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, प्रदेश प्रवक्ता प्रेरणा होणराव, अरविंद पाटील निलंगेकर,जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर,माजी जि.प. अध्यक्ष मिलिंद लातूरे, निलंगा विधानसभा प्रभारी दगडु सांळुके,दगडु सांळुके,गणेश आकडे, भाजपा तालुकाध्यक्ष कुमोद लोभे,संघटन सरचिटणीस तथा माजी जि.प. सभापती संजय दोरवे,माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे,शीतल मालू,शोभाताई पाटील,

श्रीकांत पाटील, संदीप सगरे,नागुजी येरोळे, शिवाजी टेकले,रामलिंग टेकले,उध्दव सगरे, मधुकर सगरे,ज्ञानोबा सगरे, महात्मा सगरे,विद्यानंद सगरे,प्रल्हाद पाटील आदींसह पंचक्रोशीतील नागरिक व पक्ष पदाधिकारी, लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लाहोटी स्कूल मध्ये राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा

लातूर : राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये शुक्रवारी मोठ्या उत्साहात पहिला राष्ट्रीय अंतराळ दिन साजरा करण्यात आला. गेल्या वर्षी याच दिवशी भारताला चांद्रयान–३ मोहिमेत यश मिळाले होते. भारताने चंद्राच्या पृष्ठभागावर विक्रम लँडरचे सॉफ्ट लँडिंग यशस्वीरित्या पूर्ण केले होते. हा दिवस भारताची ऐतिहासिक कामगिरी म्हणून चिन्हांकित करतो. या दिवशी भारत देश चंद्रावर रोव्हर उतरवणारा जगातील चौथा आणि दक्षिण ध्रुवीय प्रदेशाजवळ उतरणारा पहिला ठरला. चंद्र मोहिमेत मोठे यश मिळविल्यानंतर, भारत सरकारने अवकाश संशोधनातील भारताच्या वाढत्या पराक्रमाचे स्मरण म्हणून अधिकृतपणे २३ ऑगस्ट हा राष्ट्रीय अतंराळ दिवस म्हणून घोषित केला. रजिस्ट्रार प्रवीण शिवनगीकर, मनोहर कबाडे आणि अरुल शेल्वी यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती . अनुश्री सोमानी विद्यार्थिनीने राष्ट्रीय अंतराळ दिनाची माहिती दिली. उर्वी हुडेने कविता सादर केली. अथर्व मुंदडा आणि इशान सोनी यांनी चंद्रयान मिशन्स १, २ आणि ३ यावर सादरीकरण केले. अर्णव लाहोटी, मल्हार बगाटे, स्वरित खटोड, आदित्य राठी, अपूर्व गटागट आणि वरद जकोटिया यांनी आकर्षक मॉडेल्स तयार करून प्रदर्शन केले. शाळेच्या परिसरात माहितीपूर्ण चार्ट्स लावण्यात आले.

**समालोचक ..**

मतदान टक्का कमी
मत देई समालोचक
उदासीन का जनता
टिका करे आलोचक
कर्तव्याची न जाणीव
विधान अत्यंत सूचक
बोलणारे असे अनेक
मतदाते अल्प वेचक
बनाया हवे प्रत्येकांने
लोकशाहीचे संरक्षक
बोलघेवडे नको मुळी
संविधानाचे आरक्षक
प्रत्यक्षातकरे मतदान
नकाबनून राहू प्रेक्षक
कृतीशील हवी जनता
झाले बहुल समिक्षक
स्वतांवर ठेवा अंकुश
मीच माझा पर्यवेक्षक
उपदेश करतात कैक
बनाकृतीशील दिक्षक
कर्तव्य पूर्तता करता
भविष्य होई आरोचक
लोकशाहीचे महोत्सवे
बनवू शकणारं रोचक

**महारोग ..**

समाज मना जडे
वासनेचा महारोग
विखारी नजरेतून
कुणी करी संभोग
पीडीत परिवाराचे
संपत नाहीत भोग
जख्मा करे ओल्या
विचारपूसीचा ओघ
राजकारणी भडका
शस्त्र मिळतेअमोघ
संधीसाधू टपून बसे
त्वरे करे दुरूपयोग
परत शव विच्छेदन
स्थापन होईआयोग
कथन करावे प्रसंग
म्हणे द्यावा सहयोग
दंगलीमागून दंगली
उसळला जन क्षोभ
उच्चशिक्षीत जरीही
मुळी जाईना कुयोग
केवळ कायद्याने ते
बंद होणे ना उद्योग
समाज मन प्रबोधन
थांबवू शके विद्रोग
हाताळी नीट स्थिती
प्रसिध्दी करे कामोग
यंत्रणापुन्हा सुसक्षम
भले बडगाविनियोग

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# गरम आणि साधं पाणी पिण्याची योग्य वेळ कोणती?

सध्या थंडीचा मौसम सुरू झाला त्यामुळे सर्वचजण आपापल्या घरी गरम पाणी करून पित असतीलच त्यातून काहींना गरम पाणी प्यायलाही फारसे आवडत नाही त्यामुळे ते कोमट नाहीतर नॉर्मल तापमानावरील पाणी पितात. पण अनेकदा असं होतं की, थंडी आहे म्हणून अनेकजणं मधून मधून कधीही गरम पाणी पितात आणि साधं पाणीही तहान लागली म्हणून पित असतात. पण तुम्हाला माहितीये का की, थंड आणि गरम पाणी पिण्याची योग्य वेळ काय आहे तुम्हाला माहितीये का? पाण्याचे अनेक फायदे आपल्या शरीरासाठी आहेतच. त्यातून गरम पाण्याचेही अनेक फायदे आहेत परंतु अनेकांना हे माहिती नसते की, गरम आणि थंड पाणी पिण्याचे योग्य फायदे काय आहेत आणि पिण्याची योग्य वेळ कोणती आहे? असं म्हटलं जातं की खोलीच्या तापमानपेक्षा जास्त किंवा कमी असलेले पाणी हे आपल्या शरीरासाठी फायदेशीर असते. पाण्याचे आपल्या जीवनात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आयुर्वेदातही पाण्याला जीवन म्हटलं आहे. त्यामुळे आपल्या शरीरासाठीही पाण्याचे सेवन हे खूप महत्त्वाचे आहे. पचनशक्ती, हायड्रेशन, ब्लड प्रेशर, वजन आणि शरीरातील उर्जा यांसाठी पाणी हे प्रचंड महत्त्वाचे आहे. पाण्यानं आपली तहान तर भागतेच परंतु त्यातून पाणी हे गरम आणि नॉर्मल हे कधी प्यावे हेही जाणून घेणे म्हत्त्वाचे ठरेल.



कधी प्यावे गरम पाणी?

तुमची पचनक्रिया बिघडली आहे असे वाटतं असेल तर तुम्ही गरम पाणी प्या. तुम्हाला जर का भुक कमी लागत असेल तरीही तुम्हाला गरम पाणी पिणं फायदेशीर ठरेल. तुम्हाला घशात खवखव किंवा खोकला झाला असेल तर तुम्ही जास्त प्रमाणात म्हणजे अधून-मधून गरम पाणी प्या. तुम्हाला ताप आला असेल तरीही तुम्हाला गरम पाणी पिणं बंधनकारक आहे. सर्दीतही तुम्हाला गरम पाणी पिण्यासाठी पर्याय नाही त्याचसोबत पोट फुटलं असं किंवा जास्त पोटदुखी होत असेल तर तुम्ही गरम पाणी प्या.

कधी प्यावे नॉर्मल तापमानातील पाणी?

आपल्याला साधं पाणी हे आपल्या शरीरासाठी खूप महत्त्वाचे असते. त्यामुळे आपल्यालाही हेही जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल की आपण हे पाणी कधी प्यायला हवे. त्याची योग्य वेळ कोणती? जर तुम्हाला खूप तहान लागली असेल तरच नॉर्मल तापमनतील पाणी प्यावे. तुम्हाला फूड पॉईझनिंग झाले असेल तर तुम्ही साधं पाणी प्या त्यानंतर कोणाला ब्लिंडींग डिसोर्डर असतील तर त्यांनीही साधं पाणी प्यायला हवं. जर तुम्ही फारसं दमला असाल आणि जर का तुम्हाला थकल्यासारखे वाटतं असेल तर तुम्ही साधं पाणी प्या. दारूचे सेवन केल्यानंतरही तुम्ही साधं पाणी पिऊ शकता.

# (गुरु वचन), आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात. जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.

बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे मुलांचे नैतिक कर्तव्य असते. जर त्यांनी नैतिक कर्तव्याचे पालन केले नाही तर ते अधर्माचे भागीदार होतात व समाजात त्यांची निंदा होते.

बुद्ध याबाबतीत खुप संवेदनशील होते म्हणून त्यांनी व्यवस्था दिली की, व्यक्ती आपल्या आई-वडिलांच्या परवानगीशिवाय भिख्खुसंघात दीक्षा घेऊ शकत नाही. याचे तात्पर्य व्यक्ती आपल्या आई-वडिलांप्रती कर्तव्य सोडून भिक्खु बनू शकत नाही. बुद्धांने गृहस्थासाठी दिलेल्या तत्वात आई-वडिलांची सेवा प्रथम होती.

प्राचीन भारतात आई-वडिलांची सेवा सर्वात मोठे मूल्य मानले जात होते. या मूल्याच्या प्रचार-प्रसारासाठी पुराण व बौद्ध जातक कथांमध्ये अनेक प्रसंग मिळतात, ज्याच्या माध्यमातून यास जास्त व्यावहारिक बनवले जाऊ शकेल. श्रवणकुमारची गोष्ट सर्वांना माहित आहे. येथे अनेक लोककथा व लोकगीतांमध्ये आई-वडिलांच्या सेवाचा उल्लेख करण्यात आला आहे. जातक कथांमध्ये असे अनेक संदर्भ मिळतात, ज्यात बोधिसत्वांनी आपल्या आई-वडिलांच्या सेवेत जीवनाची आहुती दिली होती. चुल्लनन्दिय जातकात बोधिसत्व हिमालयात नन्दिय वानर होते. त्यास छोटा भाऊ होता. ते दोघे ८० हजार वानरांचे नेतृत्व करत असल्यामुळे आपल्या आंधळ्या आईची सेवा पूर्ण वेळ करु शकत नव्हते म्हणून त्यांनी वानरांचे नेतृत्व सोडून पूर्ण वेळ आईची सेवा करण्यास सुरुवात केली.

एकेदिवशी एक शिकारी, शिकारीच्या शोधात बोधिसत्व आई व छोट्या भावासह राहत असलेल्या झाडाखाली आला. शिकारीचे लक्ष त्याच्या आईकडे गेले व त्याने आईच्या दिशेने बाण साधला. मातृभक्त नन्दिय शिकारीसमोर येऊन म्हणाला की, हवं तर मला मार पण माझ्या आईला सोड. निर्दयी शिकारीने बोधिसत्वाची हत्या केली. त्यानंतर शिकारीने छोटा भाऊ व आईला मारले.

आई, बोधिसत्व व भावाच्या हत्येच्या महापापामुळे त्यावेळी भयंकर वादळ आले, ज्यात शिकारीचे संपूर्ण कुटूंब मरण पावले. नंतर तुटलेल्या घराच्या खांबाखाली दबून तो पापी शिकारी सुद्धा मरण पावला.

आज काही लोक आपल्या आई-वडिलांना घराबाहेर काढतात. काही त्यांची संपत्ती बळकावून त्यांना वृद्धाश्रमात पाठवतात. पण त्यांना हे माहित नसते की, त्यांचे मुलं भविष्यात त्यांच्यासोबत असाच व्यवहार करतील.

## काँग्रेस जिल्हा उपाध्यक्षपदी सुरेश बिल्लेवाड तर जिल्हा युवक सरचिटणीस पदी परसराम जाधव

भोकर - भोकर पंचायत समितीचे माजी



उपसभापती सुरेशराव बिल्लेवाड तथा यांची नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी तर सामाजिक कार्यकर्ते परसराम पाटिल जाधव यांची जिल्हा युवक काँग्रेसच्या सरचिटणीस पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

तालुक्यातील मौजे रायखोड येथील रहिवाशी सुरेश बिल्लेवाड मागील अनेक वर्षांपासून पासून सामाजिक, राजकीय, धार्मिक क्षेत्रात कार्यरत आहेत. येथील पंचायत समितीच्या उपसभापती म्हणून त्यांची निवड करण्यात आली होती. नुकतेच त्यांनी प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला.त्यांच्या राजकीय कूशल कार्याची दखल घेवून नांदेड जिल्हा अध्यक्ष बी. आर. कदम यांनी जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली तर तालुक्यातील डोरवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते परसराम पाटील जाधव यांची जिल्हा युवक सरचिटणीस म्हणून निवड करण्यात आली असून या दोघांनाही काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बि.आर. कदम यांच्या हस्ते नांदेड येथे शुक्रवार दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी निवडीचे पत्र देण्यात आले.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पा.रावणगावकर, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष पा. किन्हाळकर, पांडुरंग पाटील शिंदे, राजेश पावडे,हंसराज पाटील बोरगावकर,महेश देशमुख आदींसह अनेक मान्यवर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# बदलापूर घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडी कडून लातुरात आंदोलन,काळ्या पट्ट्या बांधून सरकारचा निषेध

लातुर प्रतिनिधी- बदलापूर येथे झालेल्या निंदनीय घटनेच्या निषेधार्थ तसेच महाराष्ट्रात अनेक ठिकाणी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात महाविकास आघाडी च्या वतीने शनिवारी लातुर मधील राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक या ठिकाणी काळ्या फिती बांधून आंदोलन करण्यात आले.यावेळी राज्यातील निष्क्रिय महायुती सरकार विरोधात मविआ कडून निषेध व्यक्त करण्यात आला. प्रारंभी विद्यार्थिनींच्या हस्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.




आंदोलनात प्रामुख्याने महिलेच्या सुरक्षेसाठी ठोस योजना आखावी, महिला अत्याचार गुन्ह्यातील नराधम आरोपींना कठोर व तात्काळ शासन व्हावे आशा मागण्या करीत आंदोलकांनी राज्य व केंद्र शासनाच्या विरोधात घोषणा देत निषेध नोंदवला.

यावेळी महाविकास आघाडीतील भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे लातूर शहर जिल्हाध्यक्ष अँड.किरण जाधव, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्रजी पवार) ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय शेटे,शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) लातूर प्रमुख सुनिल बसपुरे,अँड.उदय गवारे,महिला अध्यक्ष सौ स्मिताताई खानापुरे,विष्णुपंत साठे,रविशंकर जाधव,इम्रान सय्यद, प्रवीण सूर्यवंशी,गोविंद देशमुख,अनिल चव्हाण, अँड. देविदास बोरूळे पाटील,प्रा.प्रवीण कांबळे,अय्युब मणियार,पुनीत पाटील,आसिफ बागवान,तबरेज तांबोळी,शेख कलीम,प्रा.एम.पी.देशमुख,अँड. राहुल मातोळकर,शंकर रांजनकर, इब्राहिम शेख,अँड.शेखर हविले,इरांना पावले,प्रवीण साळुंके,मुन्नाभाऊ तळेकर, रघुनाथ मदने,जाकेर सय्यद,कल्पना फरकांडे,मनीषा कोकणे,चंद्रलेखाताई गोजमगुंडे ,आदित्य कांबळे, अजहर शेख,शताब्द शेख,तोसीब शेख,निशांत वाघमारे,उमाकांत डी,बागवान,नागरगोजे,बरकत शेख, यशपाल कांबळे,युसुफभाई बाटलीवाला,अजीज बागवान,अँड. अंगदराव गायकवाड,सुलेखा कारेपूरकर,शीतल मोरे,मीनाताई सूर्यवंशी,कमलताई मिटकरी,नागनाथ डोंगरे,हमीद बागवान,राम स्वामी, सुंदर पाटील कव्हेकर,नामदेव इगे,विजयकुमार धुमाळ,कवठेकर,सिराजभाई शेख,फारूक शेख , पवनकुमार गायकवाड,पिराजी साठे,अस्लम शेख, अभिषेक पतंगे,अमोल गायकवाड,हरिभाऊ गायकवाड,खाजापाशा शेख,करीम तांबोळी,युनूस शेख,राहुल डुमने,संजय सुरवसे,लक्ष्मण सुरवसे, मैनुभाई शेख,काशिनाथ वाघमारे,किरण बनसोडे, आकाश मगर यांच्यासह सिके मुरळी,माधव कळमुकले,विष्णूपंत साठे,चव्हाण, राहुल मातोळकर,श्रद्धा जवळगेकर,शंकर रांजणकर,राजू कतारी,शिवराम मुळावर,प्रदिप उपासे,

राहुल रोडे,राम चोथवे,दिलीप भांडेकर,समद शेख, एक्बाल बागवान,बाळू मोरे, गणेश गंगणे,भास्कर माने, प्रविण मगर,करण शिंदे,रवी संमुखराव,बाळू घोडके, संतोष घोडके,सुर्यवंशी सर यांच्यसह अनेक महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## साप्ताहिक राशिभविष्य दि. २५ ऑगस्ट २०२४ ते ३१ ऑगस्ट २०२४

........................

मेष : मनोबल व उत्साह वाढेल. तुमचे अंदाज अचूक ठरणार आहेत. शासकीय कामात यश मिळेल. आगामी काही महिन्यांचे नियोजन करण्यास दिवस चांगला आहे. गाठीभेटी व परिचय होतील. व्यवसायात वेगवान प्रगती चालूच राहणार आहे. सामाजिक व सार्वजनिक कामात सहभागी होण्याची संधी मिळेल. पत्नीसाठी विशेष खर्च कराल.

वृषभ : मानसिक प्रसन्नता लाभेल. एखादी महत्त्वाची बातमी समजेल. मित्रमैत्रिणींच्या आश्वासनावर अवलंबून राहू नका, विश्वासघाताची शक्यता आहे. काहींची आध्याात्मिक प्रगती होईल. शत्रूपीडा नाही. शासकीय कामात म्हणावे असे यश मिळणे कठीण आहे. प्रगतीचा वेग मंदावेल.

मिथुन : प्रवास शक्यतो टाळावेत. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. जुन्या भेटींना उजाळा मिळेल. काहींची आध्यात्मिक क्षेत्रात प्रगती होईल. विरोधकांवर मात कराल. प्रवासात वस्तू गहाळ होण्याची शक्यता आहे. काहींना हॉस्पिटलला भेट द्यावी लागेल. आर्थिक आवक समाधानकारक राहील. वैवाहिक सौख्य लाभेल.

कर्क : आर्थिक लाभाचे प्रमाण चांगले राहील. उधारी व उसनवारी वसूल होईल. शासकीय कामे मार्गी लागतील. आर्थिक कुचंबणा कमी होईल. वैवाहिक जीवनात मतभेदाची शक्यता आहे. काहींना मानसिक अस्वस्थता जाणवेल. मात्र आर्थिक व्यवहारात मोठे धाडस टाळावे. कामात विलंब, अडचणी थोड्याफार राहणार आहेत.

सिंह : आरोग्य उत्तम राहील. मनोबल व उत्साह वाढेल. कर्तृत्वाला संधी मिळेल. व्यवसायात फार मोठी उलाढाल साध्य करू शकाल. नोकरीत समाधानकारक स्थिती राहील. तुमच्याबद्दल वरिष्ठांचे मत अनुकूल होईल. सार्वजनिक कामात मान व प्रतिष्ठा लाभेल. खर्चाचे प्रमाण वाढेल.

कन्या : एखादी भाग्यकारक घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील. मित्रांचे सहकार्य लाभेल. थोरामोठ्यांचे परिचय होतील. गेले महिनाभर व्यवसायात होणारी कुचंबणा संपुष्टात येणार आहे. अनेकांशी सुसंवाद साधाल. नवीन परिचय होतील. सभासमारंभात सहभागी होण्याची संधी मिळेल. कौटुंबिक सौख्य लाभेल.

तूळ : तुमचे महत्त्वाचे निर्णय योग्य ठरणार आहेत. आगामी काही महिन्यांचे नियोजनास दिवस चांगला आहे. मुलामुलींसंदर्भात चांगली घटना घडेल. थोरा मोठ्यांचे परिचय होतील. अनेकांशी सुसंवाद साधाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल. उत्साह व मनोबल वाढेल. सार्वजनिक जीवनात मानप्रतिष्ठा लाभेल.

वृश्चिक : तुमचे निर्णय योग्य ठरतील. मित्रांची उत्तम साथ मिळेल. शासकीय कामात यश मिळेल. मनोबल व आत्मविश्वास वाढेल. प्रवासाचे योग येतील. पाहुण्यांचे आगमन होण्याची शक्यता आहे. बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना विशेष यश लाभेल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

धनु : जुन्या भेटींना उजाळा मिळेल. आरोग्याकडे कटाक्षाने लक्ष द्यावयास हवे. महत्त्वाची कामे पुढे ढकलावीत. एखाद्या कामाची चिंता राहील. आर्थिक क्षेत्रात धाडस नको. प्रवास शक्यतो टाळावेत. खर्चाचे प्रमाण वाढणार आहे. एखादी बातमी समजल्याने मन विचलित होईल. वाहने चालविताना दक्षता हवी. आध्याात्मिक प्रगती होईल.

मकर : व्यवसायाच्या दृष्टीने व आर्थिक लाभाच्या दृष्टीने आजचा दिवस आपल्याला खूपच चांगला ठरणार आहे. कर्जप्रकरणे मंजूर होतील. उधारी उसनवारी वसूल होईल. ज्याची तुम्ही वाट पहात आहात ते फोन व पत्रे येतील. सार्वजनिक जीवनात मान-प्रतिष्ठा मिळेल. शासकीय कामात यश मिळेल. काहींना प्रवासाचे योग येतील.

कुंभ : मनोबल व आत्मविश्वास वाढेल. अनेक अडलेली कामे मार्गी लागतील. व्यवसायात यश मिळेल. शासकीय कामे मार्गी लागतील. अपेक्षित पत्रव्यवहार व फोन होतील. घरी पाहुणे येण्याची शक्यता आहे. अनेकांशी सुसंवाद साधाल. आरोग्याकडे लक्ष द्यावे. मित्रांचे सहकार्य लाभेल.

मीन : शासकीय कामात यश मिळेल. व्यवसायात आर्थिक लाभ होतील. काहींना प्रवासाचे योग येतील. ज्यांची तुम्ही भेट घेऊ इच्छिता त्यांची भेट घडेल. पती-पत्नीमधील मतभेदाची दरी कमी होईल. अर्थात साडेसाती चालू आहेच त्यामुळे मुलामुलींचे प्रश्न हे थोडेसे त्रासदायक ठरणार आहेत.

## इतिहासात आजचा दिवस २५ ऑगस्ट

अंतरराष्ट्रीय
१८२५ - उरुग्वे हा दक्षिण अमेरिकन देश स्वातंत्र झाला.
१९१९ - जगातील पहिली प्रवासी विमानसेवा लंडन व पॅरीस या दरम्यान सुरू करण्यात आली.
१९८४ - पाकिस्तानी चाच्यांनी पळवलेल्या भारतीय विमानातील प्रवासी दुबईत मुक्त.
२००४ - रशियात दोन विमाने कोसळून ९० ठार. ही दोन विमाने एकमेकांवर धडकली.
राष्ट्रीय
१९४३ - आझाद हिंद सेनेची स्थापना.
१९७५ - उत्तर प्रदेशामध्ये बुंदेलखंड विद्यापीठाची स्थापना.
२००३ - मुंबईत दोन बॉम्बस्फोटात ४७ जण ठार झाले.
२००६ - उत्तरप्रदेशातील कांधला या गावात अवैध फटाक्याच्या फॅक्टरीत झालेल्या स्फोटात आई व मुलीसह ८ जणांचा मृत्यू झाला.
२००७ - हैदराबादमध्ये दोन प्रमुख ठिकाणांवर झालेल्या बॉम्बस्फोटांत ४० जण ठार झाले तर ७० पेक्षा अधिक लोक जखामी झाले.
२००७ - चिंकारांची शिकार केल्याप्रकरणी स्थानिक न्यायालाने दिलेली पाच वर्षाची शिक्षा सत्र न्यायालयाने कायम ठेवल्यामुळे आत्मसमर्पण करण्यास आलेला अभिनेता सलमान खानला जोधपूर पोलिसांनी विमानतळावरच अटक केली.
२००७ - टाटा स्टीलने आपल्या स्थापनेची शंभरी पुर्ण केली.
२००७ - १९ वर्षीय रश्मी शर्मा इंग्लिश चॅनल दोनदा पार करणारी सर्वात कमी वयाची भारतीय महिला बनली.
२००८ - व्हिडिओ कॉल, व्हिडिओ कॉन्फरन्सिग, ऑनलाइन गेमिंग आणि वेगवान इंटरनेट सेवा यासाठी आवश्यक असलेल्या 'थ्री जी' सेवेचा प्रारंभ भारत संचार निगम लिमिटेडच्या महाराष्ट्र परिमंडळाचे मुख्य व्यवस्थापक चंद्रप्रकाश यांच्या हस्ते झाला.
जन्म
१८६७ - मायकेल फॅरेडे, ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ
१९२३ - गंगाधर गाडगीळ, मराठी साहित्यिक, अर्थतज्ज्ञ.
१९२४ - प्रेम माथुर, प्रवासी विमानाचे संचालन करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला वैमानिक.
१९३० - शॉन कॉनरी, स्कॉटिश अभिनेते, पडद्यावरचा आद्य जेम्स बाँड.
१९६२ - तस्लीमा नसरीन, बांगलादेशी स्त्रीमुक्तीवादी लेखिका.
निधन
१७८४ - लॉर्ड जॉन इडन ऑकलंड, भारताचे माजी गव्हर्नर जनरल.

## उपदेशकथा
## मूळ स्वभाव जाईना

एका धोब्याजवळचे गाढव कमालीचे दुर्बल होते. धन्यालाच पैसा मिळत नसल्यानं गाढवाला कोण खाऊ घालणार? एके दिवशी धोब्याला वाघाचे कातडे मिळाले. त्याने आपल्या गाढवाच्या अंगावर पांघरले. त्याला वाटले, राखणदाराला वाटेल वाघ आला आहे. बिचाऱ्याला शेतात खाऊ देत मनसोक्त. गाढवाची मात्र खरोखरच चैन झाली. शेतात रात्री मनमुराद खावे व मस्त ताणून द्यावी, असा दिनक्रम खूप दिवस चालला. गाढव एव्हाना गलेलठ्ठ झाले. त्याला धडपणे पळता येईना. एके दिवशी दुरून त्याला गाढवाचा आवाज ऐकू आला. न राहवून त्यानंदेखील प्रतिसाद दिला. वाघाचे सोंग बाहेर आले. गाढवाच्या ओरडण्याने राखणदार जागा झाला आणि गाढवाला चांगलाच चोप मिळाला.

कथा उपदेश : आपला मूळ स्वभाव जात नाही. वाणीच्या दोषाने गाढवाला चांगलाच मार मिळाला.

## राजा नारायणलाल लाहोटी स्कूल मध्ये 'संस्कृत दिवस साजरा

लातूर : येथील, राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूल मध्ये संस्कृत दिन उत्साहात साजरी करण्यात आला. संस्कृत दिनानिमित्त स्कूल मध्ये दि- १३/०८/२०२० ते २०/०८/२०२४ दरम्यान संस्कृत सप्ताहचे आयोजन केले होते. श्रावण पौर्णिमा (राखी पौर्णिमा) हा दिवस 'संस्कृत दिन, म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. यानिमित्त श्लोक गायन, आशुभाषण, निबंध लेखन, रस प्रश्न, अनुछेद वाचन, प्रदर्शनी, संस्कृत गीत अश्या अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रवीण शिवनगीकर, मनोहर कबाडे, अरुल सेल्वि यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती.

या प्रसंगी संस्कृत भाषेचे विद्यार्थी मोत्र्या संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कुंजल जोशी व मैथिली सूर्यवंशी यांनी केले. वैष्णवी बाजपेयी या विद्यार्थिनीने प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन अबोली गोजमगुंडे हिने केले. बल्लाल्नाथ कुलकर्णी, मुकुंद देशपांडे,मनोज वाघमारे यांनी कार्यक्रमासाठी मोलाचे योगदान दिले.

हे पत्रक, मालक, संपादक, प्रकाशक रघुनाथ बनसोडे यांनी मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी मयूर ऑफसेट प्रिंटर्स, मेन रोड, मित्र नगर, लातूर, जि.लातूर - ४१३ ५१२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक लातूर प्रभात, पवन कॉलनी, कृपासदन शाळेजवळ, लातूर (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - रघुनाथ वाघोजी बनसोडे, मो.८८३०२५०६४५
(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकाची जबाबदारी) RNI No.: - MAHMAR/2017/72894